लोकमत


# खेळाडूंसाठी धावणारी 'रेल्वे'

क्रीडा विश्वातून



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

**'आरएसपीबी'ने देशातील २८ क्रीडा संघटनांचे सदस्यत्व घेतले असून, जागतिक रेल्वे स्पोर्ट्स महासंघाचेही भारतीय रेल्वेकडे सदस्यत्व आहे. विशेष म्हणजे, हे सदस्यपद मिळवणारे भारतीय रेल्वे ही एकमेव बिगर युरोपीय संस्था आहे.**




**सैन्य पोटावर** चालतं, या नेपोलियनच्या वक्तव्याची प्रचीती दरवेळेला येत असते. विशेषत: क्रीडापटूंच्या बाबतीत हा वाक्यप्रचार शंभर टक्के खरा आहे. योग्य वयात जर का उदयोन्मुख खेळाडूंना नोकरीची संधी मिळाली, तर असे खेळाडू क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी करून दाखवतात. याचा सबळ पुरावा म्हणजे, भारतीय रेल्वेचे खेळाडू भरतीचे धोरण.

आतापर्यंत अक्षरशः लाखो खेळाडूंना रेल्वेने नोकरीची संधी दिली आहे. आजच्या घडीला ५ हजार खेळाडू सध्या क्रीडांगणात सक्रिय आहेत आणि दरवर्षी १ हजार खेळाडूंची भरती रेल्वेमध्ये होत असते. विशेष म्हणजे, रेल्वेच्या खेळाडूंनी आतापर्यंत कमावलेल्या पुरस्कारांची संख्या पाहिली, तर रेल्वेविषयीचा अभिमान अधिक उंचावतो. २८ पद्मश्री, ९ ध्यानचंद खेलरत्न, १२ ध्यानचंद, १३ द्रोणाचार्य, आणि १८३ अर्जुन पुरस्कार रेल्वेच्या खेळाडूंनी पटकावली आहेत. या अतुलनीय कामगिरीमागे रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्डाची (आरएसपीबी) १०० वर्षांची तपश्चर्या कारणीभूत आहे. २८ विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंना रेल्वे त्यांच्या अनेक आस्थापनांद्वारे सामावून घेत असते. जोडीला खेळाडूंच्या क्रीडाकौशल्याला विकसित करण्यासाठी अभिनव योजना कार्यान्वीत करत असते. रेल्वेमध्ये नोकरी करून क्रीडाक्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची यादी बरीच मोठी आहे. क्रिकेटमध्ये नरी कन्ट्रॅक्टरपासून डायना एडुल्जी, संजय बांगर, महेंद्रसिंग धोनी, धावपटू पी. टी. उषा, ललिता बाबर, सुधा सिंग, यांसारखे कितीतरी प्रतिभाशाली खेळाडू रेल्वेने देशाला दिली आहेत.

'आरएसपीबी'ने देशातील २८ क्रीडा संघटनांचे सदस्यत्व घेतले असून, जागतिक रेल्वे स्पोर्ट्स महासंघाचेही भारतीय रेल्वेकडे सदस्यत्व आहे. विशेष म्हणजे, हे सदस्यपद मिळवणारे भारतीय रेल्वे ही एकमेव बिगर युरोपीय संस्था आहे. गुणवान खेळाडूंना त्यांच्या ऐन उमेदीच्या वयात जर का नोकरीची हमी देऊ केली, तर त्यांच्यामधील क्रीडा कौशल्य अधिक बहरू शकतं, याची जाणीव 'आरएसपीबी'ला असल्यामुळे, १८ वर्षांखालील खेळाडूंसाठी चाइल्ड सर्व्हिससारखी अभिनव योजना अंमलात आणली. बोर्डाच्या कठोर नियमामध्ये जर का १८ वर्षाखालील प्रतिभाशाली खेळाडू बसत असेल, तर अशा खेळाडूला विनाकामाचा मोबदला देऊन केवळ त्याच्या खेळावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. अशा खेळाडूंनी वयाची १८ वर्षे पूर्ण केल्यानंतर रीतसर त्यांची भरती रेल्वेमध्ये केली जाते. प्रसिद्ध धावपटू ललिता बाबर, सायकलपटू अमित सिंग यांसारखे खेळाडू वयाच्या १६व्या वर्षी रेल्वेत रूजू झाले आणि पुढे त्यांनी देशासाठी नाव कमावलं. रेल्वेचे जे खेळाडू आंतरराष्ट्रीय पदक विजेते असतात, अशा खेळाडूंना भर पगारी एक वर्षाची रजा घेण्याची मुभा असते, जेणेकरून असे खेळाडू परदेशातही प्रशिक्षण घेऊ शकतात.

मध्य रेल्वेच्या क्रीडा विभागात २० वर्षे काम केल्यानंतर सेवानिवृत्त झालेले ज्येष्ठ क्रीडा संघटक नितीन पटवर्धन म्हणतात की, अनेक खासगी व सरकारी कंपन्या खेळाडूंना नोकऱ्या देतात. परंतु, त्यांच्या तुलनेत रेल्वेत कमी सोयी-सुविधा असूनही रेल्वेचे खेळाडू अधिक नेत्रदीपक कामगिरी करतात. याचे श्रेय जाते ते, 'रेल्वे स्पोर्ट्स प्रमोशन बोर्डला.'